**तेलबिया व कडधान्य यांची हमी भावाने होणा-या खरेदीत, राज्यातील शेतकरी उत्पादक कंपन्या (FPC) यांना सहभागी होणेची संधी देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: सपस-२०१७/प्र.क्र.१९४/२४- स**

मंत्रालय, विस्तार, मुंबई-३२

दिनांक:- १२ फेब्रुवारी, २०१८

**प्रस्तावना :-**

शेतक-यांच्या हिताकरतिा प्रत्येक वर्षी तेलबिया व कडधान्य यांची हमी भावाने खरेदी, केंद शासनाने मान्यता दिल्यानंतर नाफेडच्यावतीने, **महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादित,** या राज्यस्तीय एजन्सीमार्फत केली जाते. सदरची खरेदी करतांना शेतमाल हा नाफेडने निश्चित केलेल्या Fair Average Quality (FAQ) दर्जाचा असणे बंधनकारक आहे. मात्र, राज्यातील ब-याच खरेदी केंद्रावर FAQ दर्जाचा शेतमाल नसल्यामुळे असा Non-FAQ शेतमाल हमी भावाने खरेदी करता येत नाही. परिणामी शेतक-यांना शेतमाल परत नेऊन जाण्याची नामुष्की येते. यामुळे शेतकरी निराश होतो. हे सर्व टाळण्यासाठी व शेतक-यांना दिलासा मिळावा यासाठी, शेतकरी उत्पादक कंपन्या (FPC) यांना खरेदी प्रकियेत सहभागी करुन घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

शेतकरी उत्पादक कंपन्या (FPC) यांनी त्यांच्या भागधारक असलेल्या सभासद शेतक-यांचा, शेतमाल बांधावरच Cleaning आणि Grading करावा. अशाप्रकारे FAQ करुन शेतमाल एकत्रितपणे खरेदी केंद्रावर आणावा. यामुळे शेतक-यांना स्वतंत्रपणे वाहतुकीची व्यवस्था करण्याची गरज राहणार नाही तसेच FAQ दर्जाचा शेतमाल एकत्रितपणे आल्यामुळे खरेदी केद्रांची, खरेदीची क्षमता वाढेल. FPC यांनी त्यांच्या भागधारकांची प्रमाणित यादी, खरेदी केंद्रावर सादर करावी तसेच सभासदांची नोंदणी NeML पोर्टल वर नोंदणी करावी.

२. FPC यांनी त्यांच्या भागधारक असलेल्या सभासद शेतक-यांचा शेतमाल Cleaning आणि Grading केल्याबदलचे शुल्क व शेतमाल खरेदी केंद्रापर्यंत आणल्याचा वाहतुक खर्च याबददलची रक्कम ठरावाव्दारे, निश्चित करावी व ठरावाची प्रत खरेदी केंद्रास दयावी. FPC यांनी त्यांचा नोंदणी क्रमांक, बँक खाते क्रमांक व भागधारक सभासदांची प्रमाणित प्रत खरेदी केंद्रावर सादर केल्यानंतर,FPC यांना संबंधित शेतक-यांकडून येणारी सेवा शुल्काची रक्कम, NeML च्या पोर्टलवरुन थेट, हमी भावाने खरेदी केलेल्या शेतमालाचे शेतकऱ्यास देय असलेल्या चुका-याच्या रक्कमेतून वळती करुन देण्यात येईल व शेतकऱ्यांना देय असलेली उर्वरित रक्कम NeML चे पोर्टलवरुन शेतकऱ्यांच्या खात्यात वळती करुन देण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१२११३६५११७०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Bijay Kumar

Digitally signed by Bijay Kumar
DN: c=IN, o=All India Services, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=731871a9411e73e134cafe49bca5b6f3767ef2ed4f792b8ce48e93e63c9015a6, serialNumber=98cf6eb1dea7eeeba078363f523a12ebe9119b34c44f0cb5bd3484d8ad7ea4e7, cn=Bijay Kumar
Date: 2018.02.12 11:41:50 +05'30'

**( विजय कुमार )**

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबारहिल, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री (सहकार, पणन व वस्त्रोद्योग) मंत्रालय, मुंबई
४) मा. सर्व मंत्री व राज्य मंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५) मा. राज्यमंत्री ( पणन ) यांचे मंत्रालय, मुंबई
६) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या. मुंबई,
७) अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ.पुणे
८) अप्पर मुख्य सचिव (कृषि व पणन) , कृषि व प.दु.म.विभाग, मंत्रालय, मुंबई
९) आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१०) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य छोटया शेतक-यांचा कृषि व्यापार संघ, पुणे,
११) पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१२) कार्यकारी संचालक,महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे
१३) निवड नस्ती २४ स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.